# Moby Dick by Herman Melville
## मोबी डिक: हर्मन मेलव्हिल
संक्षिप्त मराठी कथारूप अनुवाद: प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**प्रास्ताविक:**

मोबी डिक - हे एका पांढुरक्या देवमाशाचे (while whale) नाव आहे. एक सागरी साहसकथा, सूडकथा, गूढ रूपकांनी भरलेली कथा अशा वेगवेगळ्या स्वरूपांत ती महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात लावली जाते. आपल्यापैकी बऱ्याच जणांनी ती अभ्यासली असेल. आता तिचा पुन्हा एकदा आस्वाद घेऊया.

**प्रमुख पात्रे व उपयुक्त माहिती:**

१. इश्माईल - एक शिक्षक. कंटाळा आल्यामुळे एका व्हेलरवर (व्हेलची शिकार करणाऱ्या जहाजावर) तो खलाशी होतो. पेकोड नावाच्या या जहाजावरील शेवटी तो एकमेव जिवंत प्रवासी उरतो व ही कथा निवेदन करतो.

२. किकेग - दक्षिण समुद्रातील एका अज्ञात बेटावरील नरमांस-भक्षक जमातीतील खलाशी. व्हेल माशांचा निर्भय कुशल शिकारी - उत्कृष्ट भालाईत (हार्पूनर), इश्माईलचा खास मित्र. जहाजावर कोणाशी फारसा मिसळत नाही. एकदा खूप ताप भरला असताना आपण मरणार अशा खात्रीने तो नौकेच्या आकाराची शवपेटी बनवून घेतो पण तो वाचतो. कथेच्या शेवटी तो मोबी डिकशी झटापटीत मरतो व त्याच्या शवपेटीच्या सहाय्याने इश्माइल वाचतो.

३. कॅप्टन अहाब - पेकोड जहाजाचा हटवादी कप्तान. त्याच्या कपाळाच्या एका कोपऱ्यापासून तिरका कॉलरच्या आत खाली जखमेचा ताजा वण असतो. मोबी डिकशी झालेल्या एका झटापटीत त्याचा एक पाय  तुटलेला असतो. त्या जागी त्याने व्हेलच्याच हाडाचा कृत्रिम पाय बसवलेला असतो. मोबी डिकचा सूड घेण्यासाठीच तो या मोहिमेवर निघालेला असतो. त्याला दुसऱ्या कोठल्याही गोष्टीत स्वारस्य नसते. झपाटल्याप्रमाणे मोबी डिकचा शोध घेणे व त्याला मारणे याचेच त्याला वेड असते. त्या पलीकडे तो कोणाचे काहीही ऐकावयास तयार नसतो.

४. स्टारमन - जहाजावरील दुय्यम अधिकारी. अहाब यांचा सल्ला जराही ऐकत नाही.

५. मोबी डिक - एक प्रचंड व्हेल मासा. त्याच्या पांढऱ्या (albino) रंगामुळे तो इतरांपेक्षा वेगळा दिसतो. अनेक जहाजांना व माणसांना त्याने आतापर्यंत नष्ट केलेले असते. एखाद्या सैतानी शक्तीसारखा त्याचा कथेत प्रभाव जाणवतो.

६. फेदाल्ला - अहाबचा वैयक्तिक संरक्षक. हा काही भविष्येही वर्तवतो.

**कथानक:**
इश्माइल शाळेतील नोकरीला कंटाळतो व कंटाळा घालवण्यासाठी खलाशी कामावर जायचे ठरवतो. व्हेलर्स जहाजे न्यू बेडफर्डच्या धक्क्यावरून सुटतात. म्हणून तो तिथे येतो. रात्री हॉटेलमधे उतरतो. तिथे त्याला त्याचा जोडीदार भेटतो - किकेग. किकेगचा काळा रोम अवतार पाहून आधी तो घाबरतो. पण नंतर त्यांची छान मैत्री जमते. दोघेही  एकाच व्हेलरवर नोकरी स्वीकारतात. त्यांच्या जहाजाचे नाव असते पेकोड व कप्तान असतो अहाब. ज्याच्या बद्दल खूप उलटसुलट बोलले जाते.

जहाज तीन दिवसांनी सुटते. इश्माइल अहाबला पाहायला खूप उत्सुक असतो, पण पहिले चार-पाच दिवस अहाब आपल्या केबिनबाहेर येतच नाही. तो एके दिवशी डेकवर हाडाच्या पायाचा आवाज करीत येतो. हातातील सोन्याचे नाणे खांबावर ठोकून तो जाहीर करतो "जो कोणी प्रथम मोबी डिकला पाहिल व मला सांगेल त्याला हे नाणे बक्षीस मिळेल." मोबी डिकची शिकार करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण असते. आतापर्यंत जे जे त्याच्या वाटेला गेले ते ते सर्व जीव गमावून बसले होते. स्टारमन - जहाजाचा मुख्य अधिकारी - अहाबला या प्रयत्नापासून परावृत्त करायचा प्रयत्न करतो; अहाब त्याच्यावर बंदूक रोखतो व गप्प बसावयास सांगतो.

काही दिवसांनी व्हेल माशांचा एक समुदाय त्यांच्या वाटेत येतो. काही माशांची शिकार करून त्यांचे तेल गोळा करण्याचा व मांस साठवून देण्याचा जहाजाचा मुख्य उपक्रम सुरू होतो. तात्पुरता मोबी डिकचा विषय बाजूला पडतो. वाटेत येणाऱ्या प्रत्येक जहाजाच्या कप्तानाला अहाब मोबी डिकचा ठिकाणा विचारत असतो. सर्वजण त्याला या आत्मघातकी प्रयत्नापासून परावृत्त करायचा प्रयत्न करतात पण अहाब त्यांच्या उपदेशाकडे दुर्लक्ष करतो; त्याचा हट्ट चालूच ठेवतो.

दक्षिण अटलांटिकमधून दक्षिण समुद्रात प्रवेश केल्यावर एका कप्तानाकडून त्याला कळते की मोबी डिक सध्या हिंदी महासागरात आहे. अहाब लगेच सर्व सोडून पेकोडची दिशा तिकडे वळवतो. वाटेमधे इतर कप्तानांशी वागण्याचे साधारण शिष्टाचारही पाळत नाही. एका जहाजाच्या कप्तानाचा मुलगा समुद्रात हरवलेला असतो. तो अहाबला मुलगा शोधून देण्यात मदत करण्याची विनंती करतो. पण अहाब दुर्लक्ष करून मोबी डिकच्या दिशेने निघून जातो. मोबी डिक हिंदी महासागरातून पॅसिफिक महासागराकडे गेला आहे असे वर्तमान देणाऱ्या जहाजाच्या कप्तानाशी तो पुढे एक शब्दही न बोलता आपल्या जहाजावर परत येतो व आपल्या जहाजाशी दिशा पॅसिफिककडे वळवतो. सर्व जहाजांचे कप्तान त्याला मोबी डिकपासून दूर राहाण्याची कळकळीने सूचना करतात.

कीकेग एके दिवशी तापाने आजारी पडतो. काही केल्या ताप उतरत नाही. अंधश्रद्ध कीकेग आपण या तापाने मरणार अशी मनाची खूणगाठ बांधतो व जहाजाच्या सुताराला आपल्यासाठी नौकेच्या आकाराची शवपेटी तयार करावयास सांगतो. शवपेटी तयार होते पण किकेग बरा होतो. मृत्यूसाठी बनवलेली शवपेटी शेवटी इश्माईलला जिवंत राहायला उपयोगी पडते.

आता पेकोड मोबी डिकच्या परिसरात आलेली असते. कप्तान अहाब सतत डोळ्यांना दुर्बिण लावून सागर न्याहाळत असतो व इतर सर्वजण चारी दिशांना नजर फिरवत असतात. आणि एके दिवशी स्वत: अहाबलाच मोबी डिक दिसतो. सारे जहाज एकदम खडबडून उठते. सर्वजण मोबी डिकच्या शिकारीसाठी तयार होतात.

जहाज मोबी डिकच्या जवळ येते. जहाजावरील नावा खाली सोडल्या जातात व पाठलाग सुरू होतो. अहाबची नाव आघाडीला असते. डोंगराएवढ्या डिकवर तो आपला हार्पून फेकतो. डिकला हार्पून लागताच तो झटकन मागे वळतो व नावेच्या खालून एकदम हल्ला करतो; नौकेच्या चिरफळ्या उडतात. अहाब व नावाडी पाण्यात फेकले जातात. डिकच्या पाण्यातील घुसळण्यामुळे पाण्यातील लोकांना जहाजावर उचलून घेणे अशक्य होते. अहाबच्या आज्ञेप्रमाणे पेकोड मोबी डिकवर चाल करते व त्याला पळवून लावते. उरलेला दिवस डिकचा पाठलाग करण्यात जातो.

दुसऱ्या दिवशी परत मोबी डिकवरील हल्ला सुरू होतो. तीन नावा पाण्यात उतरतात. तिन्हीवरील एकेक हार्पून डिकच्या शरीरात घुसतात पण पाण्यात डिक असा काही वेडावाकडा वळतो की हार्पून्सला बांधलेले दोर एकमेकामधे गुरफटले जातात व नावा उलटसुलट फिरू लागतात. सगळ्यांना कसेबसे जहाजावर घेतले जाते, पण फेदाल्लाचा पत्ता लागत नाही.

तिसऱ्या दिवशी परत मोबी डिकचा पाठलाग सुरू होतो. आज डिक थोडा थकल्यासारखा वाटला म्हणून नावा लवकर त्याच्याजवळ पोचतात. कालच्या हार्पूनच्या दोरामधे गुंतलेला फेदाल्लाचा देह व्हेलच्या पाठीला बांधला गेलेला सर्वांना दिसतो. फेदाल्लाने वर्तवलेले पहिले भविष्य - जहाजावरील एक मृत्यू दोरात गुरफटून होईल - खरे ठरलेले असते. आपल्या पाठीमागे लागलेल्या नावा पाहून चिडलेला मोबी डिक मागे फिरतो व नावांवरच हल्ला करून त्यांच्या चिरफळ्या उडवतो. अहाबच्या नौकेखाली शिरून तो ती नौका आकाशात उडवून देतो. अहाबला व पाण्यात पडलेल्या खलाशाला वाचवण्यासाठी स्टारमन (जहाजावरील अधिकारी) पेकोडला मोबी डिककडे वळवून त्याला पळवून लावण्याचा प्रयत्न करतो. चिडलेला मोबी डिक थेट पेकोडवरच हल्ला चढवून त्याच्याही चिरफळ्या उडवून देतो. फेदाल्लाचे दुसरे भविष्य - जहाज हीच बऱ्याच जणांची शवपेटी ठरणार आहे - खरे ठरते. फेदाल्लाची तिसरी भविष्यवाणी, जी अहाबच्या मृत्यूबद्दल असते तीही थोड्याच वेळात खरी ठरते. अहाबच्या बोटीतून फेकल्या गेलेल्या भाल्याचा दोर अहाबच्या गळ्याभोवती गुंडाळला जातो व अहाब बोटीतून मोबी डिकच्या अंगावर फेकला जातो. मोबी डिक अहाबचा मृतदेह घेऊन समुद्रात अदृश्य होतो.

पेकोड जहाज आपल्या सर्व प्रवाशांसह, खलाशांसह समुद्राच्या पाण्यात बुडून जाते. फक्त एक खलाशी वाचतो, तो म्हणजे इश्माईल. पाण्यावर तरंगत असलेल्या कीकेगच्या शवपेटीला धरून तो तरंगत राहातो व तीन दिवसांनी जवळून जाणारे एक जहाज त्याला उचलून घेते. पेकोडवर

घडलेल्या घटनांचा एकमेव वाचलेला साक्षीदार, जगाला निवेदन करणारा (narrator) असा हा इश्माईल.

मोबी डिक मधील अनेक गोष्टी - स्वतः मोबी डिक, कप्तान अहाब, सागर, कीकेग, त्याची शवपेटी व इश्माईल - या अशा एका गूढ वातावरणाने भरलेल्या आहेत की लेखकाला काय म्हणायचे आहे याचे उत्तर प्रत्येक वाचकाला वेगळे वेगळे वाटते. मोबी डिकची गूढता ही वाचकांच्या दृष्टीने त्या गोष्टीचे मोठे आकर्षण आहे.

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 020-25881194, 98811-49755
Email: joshi.bindumadhav@gmail.com